९५ शाळा

महाराष्ट्र शासन

क्रमांक-एसीएलएस १०९४/७७७९/ प्राशि-७
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२

प्रति, दिनांक :- २१.१०.१९९४

विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक/पुणे/कोल्हापूर/अमरावती/नागपूर/औरंगाबाद

विषय :- सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत [इंग्रजी माध्यम]

सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीत शैक्षणिक संस्थाना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी इ. १ ली ते सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात सुरु असलेल्या वर्गासह [प्रत्येकी एका तुकडीस] इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटींवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यांत येत आहे.

२. सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्यांचा भंग झाल्यात परवानगी रद्द होईल.

२.१ सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहीजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे

२.३ शाळेत, शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहीजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय / कार्यक्रम आणि उपक्रम याचे सुयोग्य कार्यान्वयन, केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पूरविल्या पाहिजेत.

...२

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरूपात कायमस्वरूपी ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक शिस्त निर्माण करणे, तसेच दादागिरीसारखा ~~निस्सनि~~ निर्माण होणार आणि विद्यार्थी अस्वस्थ या गोष्टींवर निर्बंध ठेवणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे कार्यपद्धतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रिय अधिकाऱ्याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील, अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

३. शिक्षण उपसंचालकांनी संबंधित संस्थेस सक्षम अधिकाऱ्यामार्फत यथानियम शासनाची परवानगी कळविण्यापूर्वी खालील बाबी प्रामुख्याने पडताळाव्यात.

३.१ संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

३.२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३.३ सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळे मान्यता काढून घेतलेली नाही.

३.४ संबंधित संस्थेस कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात, घेण्याबाबतचे एतद्‌ प्रकरण प्रलंबित नाही.

३.५ संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

३.६ संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे.

३.७ शासनाची मंजूरी मागताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु.१००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

३.८ संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

३.९ संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित मान्य शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

३.१० सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुन मान्यता प्रदान करावी.

३.११ सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.१० च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

३.१२ शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे. ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.१० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

४. वरील परिच्छेद १ ते ३ मधील पडताळणी करुन विभागीय शिक्षण उपसंचालक, यांनी सक्षम अधिकाऱ्यामार्फत संस्थेस शासनाच्या परवानगीबाबतचा निर्णय कळवावा. जर यादीतील संस्थेने परिच्छेद दोन मधील कुठलीही अट पालन करण्यास असमर्थता दर्शविली, तर संस्थेला दिलेल्या परवानगीचा फेरविचार तात्काळ ~~करुन~~ करुन शासनास तसा अहवाल तातडीने पाठवावा.

५. तरी याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच वर उल्लेखिलेल्या ~~अटी~~ अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळांना प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

[ प्र. कृ. सगदेव ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. शिक्षणाधिकारी, [प्राथ.] जि.प.
३. प्रशासन अधिकारी नगरपालिका म.न.पा. शिक्षण मंडळ,
४. मा. शालेय शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री [शा. शि.] यांचे खाजगी सचिव

(४ व ५ :) यांना माहितीसाठी

६. निवड नस्ती

सन १९९४-९५ पासून (जून १९९४ पासून) इंग्रजी माध्यमाच्या नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी दिल्याबाबत शासन पत्र क्र. खाप्राशा १०९४/७००८/प्राशि-२, दि. ३१.१०.९४ चे सहपत्र

जिल्हा:- पुणे

| अ.क्र. १. | संस्थेचे नांव व पत्ता २. | शाळेचे ठिकाण ३. | माध्यम ४. |
|---|---|---|---|
| १. | सेंट थॉमस आर्थोडॉक्स सिरीयन चर्च स्मशान रोड, पुणे-३. | सहकारी, पुणे-३ | इंग्रजी |
| २. | ज्ञानवर्धिनी शिक्षण संस्था, सदाशिव पेठ पुणे ११ | शिंगणे बुद्रुक शिवणेवाडी, ता. हवेली | इंग्रजी |
| ३. | पी. ए. इनामदार एज्युकेशन ट्रस्ट, पुणे १ | लक्ष्मीनगर, भेरी, ता. हवेली | इंग्रजी |
| ४. | सोसायटी ऑफ कारमेलिटीज पुना जिल्हा खडकी, पुणे ३ | येरवडा | इंग्रजी |
| ५. | पुना डायोसेशन एज्युकेशन सोसायटी पुणे-१ | लोणावळा | इंग्रजी |
| ६. | प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर | यमुनानगर, निगडी | इंग्रजी |
| ७. | ज्ञान प्रकाश एज्युकेशन ट्रस्ट, येरवडा | रामनगर, पुणे | इंग्रजी |
| ८. | खेड ता. शि. प्र. सं. राजगुरुनगर | चाकण, ता. खेड | इंग्रजी |
| ९. | धनिराज धर्मदाय न्यास पाषाण, पुणे ८ | घाकड, ता. मुळशी | इंग्रजी |
| १०. | अभिनव शिक्षण प्रसारक मंडळ, बाणेर | बाणेर, ता. हवेली | इंग्रजी |
| ११. | लायन्सक्लब एज्युकेशन असोसिएशन देहू रोड | मागुडी, ता. हवेली | इंग्रजी |
| १२. | गेनबा सोपानराव मोझे चॅरिटेबल ट्रस्ट, येरवडा | खराडी, ता. हवेली | इंग्रजी |
| १३. | सोसायटी ऑफ डॉटर्स ऑफ मेरी चांदा, जि. चंद्रपूर | पिंपळे, गुरव | इंग्रजी |
| १४. | विद्या प्रतिष्ठान बारामती जि. पुणे | एम. आय. डी. सी. बारामती. | इंग्रजी |

जिल्हा:- रायगड

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नवनिर्माण शि प्रतिष्ठान अलिबाग, जि. रायगड | वाशी, ता. पेण | इंग्रजी |

जा. क्र. प्राशि/प्राशि/खाप्राशा/स्थलांतर/पुवि/०६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक:- 3 1 MAR 2006

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जि.प. पुणे.

विषय :- खाजगी प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- मा. शालेय शिक्षण विभागाकडील जा. क्र. प्राशास्थ १८०५/ (१०३/०५) प्राशि-२ दि. १३ मार्च २००६चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबतचे आपले जा. क्र. जिप/शिक्षण/खाप्राशा/प्रा-२/५०४ दि. ८/११/२००५ पत्र पहावे.

होली अन्जल्स कॉन्व्हेंट सोसायटी, नगररोड कल्याणीनगर, येरवडा, पुणे संचलित होली एंजल्स स्कुल, नगररोड, कल्याणीनगर, येरवडा, पुणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेचे नगररोड कल्याणीनगर, येरवडा, पुणे येथून मांजरी खुर्द ता-हवेली, जि-पुणे येथे स्थलांतर करण्यास संदर्भाधीन पत्रान्वये खालील अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१) मुळ ठिकाणच्या शाळेतील विद्यार्थ्यांची सोय नजीकच्या प्राथमिक शाळेत करण्यात यावी.

२) स्थलांतरीत प्राथमिक शाळेतील कोणत्याही वर्गासाठी, कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.

३) स्थलांतरीत शाळेसाठी लागणारी आवश्यक ती जागा, फर्निचर, ग्रंथालय, खेळाचे मैदान इ. शैक्षणिक व भौतिक सुविधांची पूर्तता संस्थेने केली पाहिजे.

४) स्थलांतरीत ठिकाणच्या अन्य शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची संस्थेने काळजी घ्यावी.

५) पुर्वीच्या ठिकाणच्या प्राथमिक शाळेतील नियमानुसार मान्य पदावरील, आरक्षणानुसार नियुक्त केलेले, क्षेत्रीय अधिकाऱ्यांची मान्यता असलेले व कायम असलेले सर्व अर्हताप्राप्त शिक्षक स्थलांतरीत शाळेत सामावून घेण्यात यावेत व तसे संस्थेकडून हमीपत्र घेण्यात यावे.

६) सदर शाळेतील नियमानुसार देय असलेल्या, आरक्षणानुसार भरलेल्या, क्षेत्रीय अधिकाऱ्यांची मान्यता असलेल्या व बंदी घालण्यापूर्वी नेमलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्थलांतरीत शाळेत सामावून घेण्यात यावे.

७) या स्थलांतरीत शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या अटीत कोणताही बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

८) प्रस्तावित ठिकाणी पटसंख्येअभावी अतिरिक्त शिक्षक झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संस्थेवर राहील.

प्रस्तुत प्रकरणी आवश्यक ती पुढील तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, व तसे या कार्यालयास कळविण्यात यावे.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत- मा. श्री. भि. ध. मंता,
कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सादर.

..२..

ATTESTED

HEADMISTRESS
HOLY ANGELS' CONVENT HIGH SCHOOL
TAL HAVELI, MANJIRI KHURD, PUNE 412 307

सरसरी हस्तांतरण
कारमेलाईट — होली एंजल्स

शिक्षण अधीक्षक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक:- 24 AUG 2005

प्रति,
शिक्षण प्रमुख,
म.न.पा. शिक्षण मंडळ, पुणे.

विषय :- कारमेलाईटस संस्थेची" होली एंजल्स कॉन्व्हेंट स्कूल कल्याणीनगर येरवडा ही इंग्रजी माध्यमाची विना अनुदानित प्राथमिक शाळा होली एंजल्स सोसायटीकडे कायम स्वरूपी हस्तांतरण करणेस मान्यता बाबत.

संदर्भ:- शिक्षण प्रमुख, म.न.पा. शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्र. बाप्रशा/१२४१/दि. २८/६/०५.

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, कारमेलाईटस संस्थेची होली एंजल्स कॉन्व्हेंट स्कूल कल्याणीनगर, येरवडा ही इंग्रजी माध्यमाची विना अनुदानित प्राथमिक शाळा होली एंजल्स सोसायटीकडे कायम स्वरूपी हस्तांतरणा बाबतची सुनावणी या कार्यालयात दि. ८/८/२००५ रोजी घेण्यात आली. सदर सुनावणी करिता दोन्हीही संस्थेचे अध्यक्ष व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या प्रस्तावात मा. धर्मादाय आयुक्त यांच्या कडील ना हरकत पत्रा शिवाय इतर सर्व कागदपत्रे दोन्हीही संस्थांनी सादर केलेली आहेत. खालील अटीवर संस्थेने केलेल्या ठरावानुसार सदर शाळा नवीन संस्थेकडे हस्तांतरणास परवानगी देण्यात येत आहे.

१) मान्य पदानुसार शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे वेतन अदा करावे.
२) भविष्यात निर्माण होणाऱ्या रिक्त पदावर शासनाने निर्धारित केलेल्या अर्हतेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेमणे संस्थेस बंधनकारक आहे.
३) होली एंजल्स कॉन्व्हेंट स्कूल या प्राथमिक शाळेला ज्या अटीवर शासनाने मान्यता दिलेली आहे त्या सर्व अटी नवीन संस्थेला बंधनकारक राहतील.
४) कोणत्याही विद्यार्थ्यांकडून अगर पालकांकडून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष देणगी स्विकारता येणार नाही.
५) शासनाने/शिक्षण खात्याने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश नवीन संस्थेवर बंधनकारक राहतील.
६) सदरच्या हस्तांतरणामुळे कोणत्याही कर्मचाऱ्याच्या सेवेवर विपरीत परिणाम होणार नाही.
७) सदरच्या हस्तांतरणाबाबत काही हरकत अथवा कायदेशीर अडचण आल्यास अगर न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याला दोन्हीही संस्था जबाबदार राहतील.
८) सुनावणीच्या वेळी ज्या अटी व शर्ती ठरलेल्या आहेत त्या बाबतची कार्यवाही दोन्ही संस्थांनी करावयाची आहे.

सदर प्रकरणी वरील प्रमाणे दोन्हीही संस्थेला आपल्यास्तरावरून कळविण्यात यावे व कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

ATTESTED

Sr. Alka
HEADMISTRESS
HOLY ANGELS' CONVENT HIGH SCHOOL
TAL.HAVELI, MANJIRI KHURD, PUNE 412 307

स्थळप्रतीवर मा. शि. अ. यांची सही असे.

शिक्षण अधीक्षक,

प्रत-